## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १३०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
**दिनांक १२/०३/२०१८**

**१) अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन जखमी :—**

दिंनाक ११/०३/२०१८ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील जखमी स्वपनील हटवार सुभम पारधी हे पोलीस भरतीची प्रॅक्टीस करीत असतांना, वडेगांव फाटा येथे यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन दोन्ही जखमींना धडक मारून जखमी करून पळुन गेल्याने, फिर्यादी धनराज चेंदुजी हटवार वय ५० वर्ष रा. भंडाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९७,३३७ भादवी. सहकलम १३४,१८४/१७७ मोवाका.अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन उजव्या हाताला चावा घेवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ११/०३/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे बैल बांधण्याचे खुंट खनतीने खोदीत असतांना फिर्यादी ही आडवी आली असता आरोपीने तिला ढकल ढुकल केल्याने ती नालीवर पडल्याने तीचे तोंडाला मार लागला व फिर्यादीचा मुलगा आडवा आला असता, आरोपीने त्याचे उजव्या हाताला चावा घेवुन जखमी केल्याने, फिर्यादी सौ. सुनदा दामोदर कुवासे वय ४० वर्ष रा. संराडी बुज. यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,३२३,५०६, भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन भांडण करुन थापड बुक्यांनी मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक ११/०३/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. कलीता संघरत्न मेश्राम वय ३३ वर्ष, रा. परसोडी याला आरोपतांनी संगनमत करुन ग्रा.पं. नालीचे बांधकामावरुन भांडण करुन फिर्यादीला व तीचे पतीला ढकलढुकल करुन थापड बुक्यांनी मारपिट केली व फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४, ५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर

**४) वैनगंगा नदीचे पात्रात इसमाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद . :—**

दिंनाक ११/०३/२०१८ चे ०८.०० वाजता पुर्वी दरम्यान यातील मृतक राकेश रतनदास संतेकार वय ३० वर्ष, रा. नेहरु वार्ड भंडारा हा दिनांक ०८/०३/२०१८ पासुन गुम असुन आज शोध दरम्यान दिनांक ११/०३/२०१८ ला वैनगंगा नदीचे पात्रातील पाण्यात मृत नदीचे पात्रातील पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी रामविलास रतनदास संतेकार वय ५५ वर्ष रा. नेहरू वार्ड मेंढा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेरे पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/०३/२०१८ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन सिहोरा बसस्टॉप सार्वजनिक ठिकाणी उभी करून येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. सार्वे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**६) अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ११/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन करडी व तुमसर येथे अवैध देशी दारु अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २२ लिटर हातभट्टी दारु किंमती २२०० चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ११/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनाकरीता १० ईतर वाहनांवरती – १०८ केसेस करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(पोनि. एस.टी. घुसर )
स्थागुशा भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.